**ठळक बातम्या**

- विद्यापीठं नवोन्मेष आणि संशोधनाची केंद्र बनावीत, असं मुख्यमंत्र्यांचं वक्तव्य
- नागालँड विधानसभेतल्या ७ आमदारांच्या पक्षांतरप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस कायदेशीर पाऊल उचलण्याच्या तयारीत
- देशातल्या सहा कोटींहून अधिक शेतकऱ्यांना डिजिटल ओळखपत्रं मिळाल्याची केंद्र सरकारची माहिती

**आणि**

- धुळ्यात कपाशीचं बनावट बियाणं, तर अमरावतीत प्रतिबंधित एचटीबीटी बियाणं मोठ्या प्रमाणात जप्त

**<><><><>**

विद्यापीठं केवळ शिक्षणसंस्था आणि अभ्यासक्रम नियोजन करणारी संस्था नाही तर संशोधन, नवोन्मेष आणि स्टार्ट अप सुरू करणारी केंद्रं  बनावीत, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केलं. नाशिकमधल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या ‘चक्र’ या  उत्कृष्टता केंद्राचं भूमिपूजन आणि संकेतस्थळाचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. ‘चक्र' च्या माध्यमातून संशोधन, नवोन्मेष आणि स्टार्टअपला बळ मिळेल, असंही ते म्हणाले. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विद्यापीठाच्या १५० दिवसांच्या कृती आराखडा पुस्तिकेचं प्रकाशनही  करण्यात आलं.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते ५ जून रोजी नागपूर- मुंबई महामार्गावरील ७६ किमी लांबीच्या शेवटच्या टप्प्यातल्या समृद्धी महामार्गाचं उद्घाटन करण्यात येणार आहे. नाशिकच्या इगतपुरी ते ठाण्यातल्या आमणे यांना जोडणारा हा ७०१ किमी लांबीच्या हाय-स्पीड कॉरिडॉरचा शेवटचा टप्पा आहे. हा टप्पा पूर्ण झाल्यामुळे समृद्धी महामार्गावरुन आता नागपूर ते मुंबई थेट प्रवास करता येणार असल्याची माहिती राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

**<><><><>**

मराठी भाषा आणि महाराष्ट्राचा अपमान करण्याबद्दल मंत्री प्रताप सरनाईक यांना बडतर्फ करा अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं केली आहे. महाराष्ट्राची अधिकृत भाषा मराठी असून मराठी भाषेसाठी आणि मराठी लोकांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष कायम संघर्ष करत आला असल्याचं पक्षाच्या मुखपत्रात म्हटलं आहे. मंत्री प्रताप सरनाईक यांनी मीरा-भायंदर भागात आल्यावर आपल्या तोंडातून आपसूक हिंदी बाहेर पडते अशा अर्थाचं वक्तव्य केलं होतं. त्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ही टीका केली आहे.

**<><><><>**

नागालँड विधानसभेतल्या सात आमदारांनी केलेल्या पक्षांतराला आव्हान देण्यासाठी अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सर्व पर्यायांचा विचार करत आहे, असं पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी काल भोपाळ इथं बातमीदारांशी बोलताना सांगितलं. पक्षांतरविरोधी कायद्याखाली हे प्रकरण तपासलं जाईल, यासाठी शक्य ते कायदेशीर पाऊल उचललं जाईल, असं श्रीवास्तव यांनी सांगितलं. विधानसभा निवडणुकीत जनतेनं दिलेल्या जनादेशाचं रक्षण करण्यासाठी पक्ष वचनबद्ध आहे, असं ते म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वच्या सर्व सात आमदार सत्ताधारी नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टीत ३१ मे रोजी सामील झाले. एनडीपीपी ने युती धर्माचं उल्लंघन केल्याचा आरोपही राष्ट्रवादी काँग्रेसनं केला आहे.

**<><><><>**

देशातल्या सहा कोटींहून अधिक शेतकऱ्यांची डिजिटल ओळखपत्रं तयार केली आहेत. केंद्र सरकारनं जारी केलेल्या ताज्या आकडेवारीत ही माहिती दिली आहे. या ओळखपत्रांद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदी, पशुधन, पिकांची माहिती आणि त्यातून मिळालेल्या उत्पन्नाची नोंद केली जाणार आहे. या ओळखपत्रांचा उपयोग पीकविमा तसंच प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेचा लाभ मिळवण्यासाठी होणार आहे.

उत्तर प्रदेशात सर्वाधिक, १ कोटी ३० लाख शेतकऱ्यांची ओळखपत्र तयार केली आहेत. तर महाराष्ट्रात ९९ लाख, मध्य प्रदेश ८३ लाख, आंध्र प्रदेश ४५ लाख, गुजरात

४४ लाख, तर राजस्थानात ७५ लाख शेतकऱ्यांची डिजिटल ओळखपत्रं तयार केली आहेत.

<><><><>

बनावट कागदपत्रांचा वापर करून आखाती देशांमध्ये प्रवास करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चार नेपाळी तरुणांना मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. ते बिहारमधून भारतात आले होते. प्रत्येक आरोपीनं प्रवास व्यवस्था आणि बनावट कागदपत्रांसाठी एजंटला नेपाळी चलनात अडीच लाख रुपये दिल्याचं उघडकीला आलं आहे. अशाच प्रकारे बेकायदेशीरपणे परदेशात जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहा नेपाळी तरुणांना गेल्या आठवड्यात अटक केली होती.

<><><><>

धुळे कृषी विभागाच्या पथकाने धुळे शहरात आज सकाळी खासगी बसगाड्या आणि वाहनांवर छापे टाकून २० लाख रुपये किमतीचं बनावट तसंच राज्यात प्रतिबंध असलेलं कपाशीचं बियाणं जप्त केलं आहे. पथकातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रात्रभर गस्त घालताना मिळालेल्या माहितीच्या आधारे वेष बदलून ही कारवाई तडीस नेली. हे बियाणं गुजरातमधून महाराष्ट्रात विक्रीसाठी आणलं जात होतं आणि त्यात बाराशे ते तेराशे पाकिटांचा समावेश होता.

<><><><>

कृषी विभागाच्या पथकानं अमरावतीतून प्रतिबंधित एचटीबीटी बियाण्याची अडीच हजार पाकिटं जप्त केली आहेत. जप्त केलेल्या या बियाण्यांची किंमत २५ लाख रुपये आहे. गुजरातमधल्या अहमदाबादमधून अमरावतीमार्गे नागपूरला जाणाऱ्या खासगी बसच्या तपासणीत हा साठा आढळून आला. याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरु आहे. यापूर्वी कृषी विभागाच्या पथकानं जिल्ह्यात विविध ठिकाणी अनधिकृत एचटीबीटी बियाण्यासंदर्भात सहा कारवाया केल्या असून त्यापैकी ५ कारवायांमधे जप्त केलेला माल गुजरातमधून आल्याचं उघडकीला आलं आहे.

<><><><>

विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी असणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केलं. ते

आज बिहारमधल्या मोतिहारी इथं शेतऱ्यांचं जीवनमान उंचावण्याबाबत आयोजित केलेल्या चर्चासत्रात बोलत होते. देशभरात १६ हजार शास्त्रज्ञ थेट शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. उत्पादनात वाढ करणं, उत्पादन खर्च कमी करणं, आणि शेतमालासाठी दर निश्चित करणं यावर ते काम करत असल्याचं कृषीमंत्री म्हणाले. सरकार डाळी, तेलबिया यांच्या लागवडीला प्रोत्साहन देत असून शेती अधिक फायदेशीर करणं हा सरकारचा उद्देश आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं. भारतीय अर्थव्यवस्थेची सर्वात मोठी शक्ती शेती आहे, असं चौहान म्हणाले.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि पॅराग्वेचे अध्यक्ष सॅंटियागो पेना पॅलासिओस यांच्यात नवी दिल्ली इथं शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा झाली. या भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण क्षेत्रांचा आढावा घेतला. दोन्ही देशांमध्ये डिजिटल तंत्रज्ञान, शेती, संरक्षण, रेल्वे, अंतराळ यासह इतर क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध असून दहशतवादाविरुद्धच्या लढाईत दोन्ही देश एकसाथ असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले.

पॅलासिओस हे आज सकाळी तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर नवी दिल्लीत पोहोचले. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी त्यांची भेट घेतली आणि विविध क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यावर चर्चा केली. यानंतर ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचीही भेट घेणार आहेत. पॅराग्वेला परतण्यापूर्वी ते मुंबईलाही भेट देणार असून या भेटीदरम्यान ते राजकीय नेते, व्यावसायिक तसंच विविध उद्योगांचे प्रतिनिधी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या व्यक्तींची भेट घेतील.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं IATA अर्थात आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या ८१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होणार आहेत. यावेळी मोदी उपस्थितांना संबोधित करतील. कालपासून सुरू झालेल्या IATA कार्यक्रमाची उद्या सांगता होईल. या कार्यक्रमादरम्यान, जगभरातील नेते भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात झालेल्या उल्लेखनीय परिवर्तनाचे आणि देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात त्याच्या योगदानाचे साक्षीदार होतील, असं प्रधानमंत्री कार्यालयानं दिलेल्या

निवेदनात म्हटलं आहे. IATA ची शेवटची वार्षिक सर्वसाधारण सभा ४२ वर्षांपूर्वी १९८३ मध्ये झाली होती.

**<><><><>**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूरने आज जेईई ऍडव्हान्स परीक्षेचा निकाल जाहीर केला. result25.jeeadv.ac.in. या संकेतस्थळावर हा निकाल उपलब्ध असेल. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधे पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी ही परीक्षा आवश्यक असते.

**<><><><>**

बीड इथं ट्रकनं ऑटोला धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. बीड जिल्ह्यात माजलगाव-तेलगाव मार्गावर काल रात्री हा अपघात झाला.

**<><><><>**

किमान आधारभूत दरानं खरेदी योजनेअंतर्गत ज्वारी, मका आणि बाजरी या भरडधान्यांची खरेदी करण्यात येणार असून जळगाव जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी ऑनलाईन नोंदणीची अंतिम तारीख १५ जून पर्यंत वाढविण्यात आली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ९ हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. पणन महासंघामार्फत जिल्ह्यात एकूण १८ खरेदी केंद्र चालवली जाणार आहेत.

***//<><><><>//***